# प्रकरण चौथे

## ‘महिला पोलीसांवर पडणारे ताण-तणाव आणि त्याचे परिणाम’

# प्रकरण चौथे

## महिला पोलीसांवर पडणारे ताण-तणाव आणि त्याचे परिणाम

## Stresses and Strains and it's Impact (on Women Police)

### प्रस्तावना :

पोलीसी काम म्हणजे 'शांतता आणि सुव्यवस्था' या मोघम शब्दांपलीकडे सर्वसामान्य नागरिकांना फारसे माहित नसते. पोलीसी काम अमुक ते तमुक वाजेपर्यंत नसते. उदा. दिवस-रात्रीची गस्त, जनसमुदायावर नियंत्रण, रहदारीचे नियंत्रण, थिएटर, देवळे नियंत्रण, आग लागलेल्या ठिकाणी लोकांचे आणि त्यांच्या मालमत्तेचे संरक्षण, हॉटेलवर देखरेख, दारूड्यांचा, समाजकंटकांचा बंदोबस्त, फेरीवाल्यांशी मुकाबला, मिरवणूक, जाहीर सभा, संप, ऐवढेच नव्हे तर प्रदुषणापासून जनतेचे संरक्षण इत्यादी.

इतका भार शिरावर घेऊनही समाजास पोलीसांबद्दल सहसा कौतुक तर नसतेच पण एक प्रकारचा आकस असतो. चिकाटी, कल्पक बुध्दी, एक प्रकारचे उपजत अंतर्ज्ञान, शोध घेताना छोटा धागाही पकडण्याची चलाखी अशा अनेक समस्यांचा सामना करावा लागतो.[१] (वागळे वि.द. : १९८९ : १४-१५)

कोल्हापूर शहर पोलीस प्रशासनात महत्त्वाची भूमिका पार पाडणारी, 'महिला पोलीस' यांना अशा अनेक समस्यांचा त्यातून निर्माण होणाऱ्या ताण-तणावांचा आणि त्यांच्या परिणामांचा सामना करावा लागतो.

प्रस्तुत प्रकरण 'महिला पोलीसांवर पडणारे ताण-तणाव आणि त्याचे परिणाम', यामध्ये प्रामुख्याने कोल्हापूर शहरातील महिला पोलीसांवर पडणारे शारीरिक, मानसिक, कौटुंबिक आणि संघटनात्मक ताण-तणाव, त्यांची कारणे आणि परिणाम यांचे विवेचन केले आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये महिला पोलीसांना कराव्या लागणाऱ्या तडजोडी, भूमिकेविषयी दृष्टीकोन, शारीरिक, मानसिक, कौटुंबिक, संघटनात्मक ताण-तणाव, महत्वाकांक्षा इत्यादी परिवर्त्यासंबंधीच्या माहितीचे वर्गीकरण आणि विश्लेषण दिले आहे.

१. पोलीस काम : **(Police Work)**

सारणी क्र.४.१ मध्ये उत्तरदात्यांनी 'पोलीस' दलातील काम कसे वाटते / आहे ते दर्शविले आहे.

सारणी क्र.४.१

पोलीस दलातील काम

| अ.नं. | काम | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | कठीण | १४ | २६.९% |
| २. | धकाधकीचे | ३७ | ७१.२% |
| ३. | सोपे | ०१ | १.९% |
| | एकूण | ५२ | १००% |

शांतता आणि सुव्यवस्थेशिवाय पोलीसांना विविध कर्तव्ये पार पाडावी लागतात. उदा. दिवस-रात्र गस्त, जनसमुदायावर नियंत्रण, रहदारीचे नियंत्रण, थिएटर, देवालये बंदोबस्त, हॉटेलवर देखरेख, जाहीर सभा, संप, लॉक आऊट, फेरीवाल्यांशी मुकाबला इत्यादी.

सारणी क्र.४.१ वरून बहुसंख्य उत्तरदात्यांनी 'पोलीस दलातील काम'धकाधकीचे (७१.२%) असे सांगितले. तिथे कठीण (२६.९%) असे काही उत्तरदात्यांनी सांगितले. केवळ एका उत्तरदात्याने सोपे आहे असे सांगितले.

वास्तविक परिस्थिती पाहताना पोलीस दलातील काम अत्यंत धकाधकीचे आहे.

रिजवाना कश्यप आपल्या 'मंथन - पोलीस कुठे कुठे पुरा पडणार' ........ लेखात म्हणतात, दहीहंडीपासून पोलीस बंदोबस्त सुरू होतो. गणेशोत्सवात विसर्जनाच्यावेळी चोवीस चोवीस तास पोलीस (महिला पोलीसांचा समावेश आहे.) उभे असतात. त्यांचे पाय इतके सुजतात की, कित्येकदा पायातून शूज कापून काढावे लागतात.[२]

(रिजवाना कश्यप 'दक्षता' : २००४ : ८)

२. तडजोडी : **(Compromise / Adjustment)**

सारणी क्र.४.२ मध्ये उत्तरदात्यांना पोलीस भूमिका पार पाडताना कोणत्या गोष्टींशी तडजोड करावी लागते ते दर्शविले आहे.

सारणी क्र.४.२

उत्तरदात्यांना कराव्या लागणाऱ्या तडजोडी

| अ.नं. | तडजोडी | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | कौटुंबिक आयुष्य | २६ | ५०.०% |
| २. | पोलीस भूमिका | ०५ | ९.६% |
| ३. | शैक्षणिक कारकीर्द | १३ | २५.०% |
| ४. | वरील सर्व | ०८ | १५.४% |
| | एकूण | ५२ | १००% |

आजची नोकरदार स्त्री गृहिणी, माता आणि नोकरी अशा तिहेरी भूमिकांच्या ओझ्याखाली दडपलेली आहे.

महिला पोलीस ही भूमिका बजावताना एक 'स्त्री' म्हणून महिला पोलीसांना अनेक तडजोडी कराव्या लागतात.

उत्तरदात्यांपैकी बहुतांश महिला पोलीसांना आपल्या कौटुंबिक आयुष्याशी (५०%) तडजोड करावी लागते. त्या खालोखाल (२५%) उत्तरदात्यांना शैक्षणिक कारकीर्दीशी तडजोड करावी लागली आहे. तर पोलीस भूमिकेशी (९.६%) उत्तरदात्यांना तडजोड करावी लागली आहे. वरील तीनही गोष्टीशी (१५.४%) उत्तरदात्यांना तडजोड करावी लागते. ज्याचे त्यांच्यावर अनेक ताण-तणाव पडतात.

उत्तरदात्यांशी केलेल्या चर्चेतून, बहुसंख्य महिला पोलीसांना कौटुंबिक आयुष्याशी तडजोड करताना, अनेक छोट्या छोट्या आनंदाला मुकावे लागते. जसे की, विवाहीत महिला पोलीसांना आपल्या मुलांच्या आनंदात सहभागी होता येत नाही. इतर स्त्रियांप्रमाणे सण-उत्सव, समारंभात सहभागी होता येत नाही, मुलांना पाहिजे तितका वेळ देता येत नाही, इतर स्त्रियांप्रमाणे नटता येत नाही की सजता येत नाही. नेहमी 'खाकी' मध्ये रहावे लागते, अशी कारणे कळाली. तर काही उत्तरदाते शास्त्र, वाणिज्य शाखेतून पदवीधर झालेले आहेत. त्यांना पुढे शिकण्याची प्रबळ इच्छा असूनही या नोकरीमुळे संधी मिळत नाही. त्यामुळे त्यांना शैक्षणिक कारकीर्दीशी तडजोड करावी लागली आहे. यामध्ये कौटुंबिक परंपरा आणि आर्थिक नाईलाज या कारणांतून या क्षेत्रात प्रवेश करणाऱ्यांची संख्या जास्त आहे. तर काही उत्तरदात्यांनी पाहिजे तशी कौशल्य दाखविण्यास संधी मिळत नसल्याने पोलीस भूमिकेशी तडजोड करावी लागते असे सांगितले.[३] (पोलीस मुख्यालय - १८ ते २१ जानेवारी, २००८)

१. महिला पोलीसांवर पडणारे ताण-तणाव आणि त्याचे परिणाम :

अ) महिला पोलीस आणि ताण-तणाव :

एका संशोधनामध्ये असे आढळून आलेले होते की, जगातील दोन व्यवसायामध्ये अतोनात तणाव सहन करावा लागतो. पहिला व्यवसाय म्हणजे सर्जन व दुसरा 'पोलीस'.[४]

(सुरेश खोपडे : २००३ : २६३)

३. शारीरिक ताण-तणाव : **(Physical Stresses and Strains)**

सारणी क्र.४.३ मध्ये उत्तरदात्यांवर किती शारीरिक ताण-तणाव पडतात ते दर्शविले आहे.

सारणी क्र.४.३

शारीरिक ताण-तणाव

| अ.क्र. | ताण-तणाव | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ५२ | १००% |
| २. | नाही | - | - |
| | एकूण | ५२ | १००% |

सारणी क्र.४.३ वरून सर्वच उत्तरदात्या महिला पोलीसांवर शारीरिक ताण-तणाव (१००%) पडतात.

४. शारीरिक ताण-तणावाची कारणे :

सारणी क्र.४.४ मध्ये उत्तरदात्यांवर पडणाऱ्या ताण-तणावांची कारणे दर्शविली आहेत.

सारणी क्र.४.४

शारीरिक ताण-तणावांची कारणे

| अ.क्र. | कारणे | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अति जोखमीची कामे | ०४ | ७.७% |
| २. | विविध प्रकारचे बंदोबस्त | ०९ | १७.३% |
| ३. | पुरेशी झोप न मिळणे | ०९ | १७.३% |
| ४. | अतिरिक्त नाईट ड्युटी | ०६ | ११.५% |
| ५. | गर्दीवर नियंत्रण करताना धावपळ | ०४ | ७.७% |
| ६. | कामाचे जादा तास | ०७ | १३.५% |
| ७. | सलग उभे राहणे | ०२ | ३.८% |
| ८. | प्रचंड व्याप | ०३ | ५.८% |
| ९. | बदलणाऱ्या ड्युटी | ०३ | ५.८% |
| १०. | गार्ड ड्युटीचा त्रास | ०१ | १.९% |
| ११. | वेळेवर जेवण न मिळणे | ०४ | ७.७% |
| | एकूण | ५२ | १००% |

सारणी क्र.४.४ वरून उत्तरदात्या सर्व महिला पोलीसांवर शारीरिक ताण-तणाव दिसून आले. आणि त्याची कारणे विविध दिसून आली. प्रामुख्याने विविध प्रकारचे बंदोबस्त आणि पुरेशी झोप न मिळणे अशी कारणे असणारे प्रत्येकी ९ (१७.३%) उत्तरदाते आहेत. विशेष करून अतिरिक्त कामाचे तास यामुळे शारीरिक ताण-तणाव पडणारे (१३.५%) उत्तरदाते आहेत. त्या खालोखाल अतिरिक्त नाईट ड्युटी हे शारीरिक ताण-तणावाचे कारण असणारे (११.५%) उत्तरदाते आहेत. अति जोखमीची कामे, गर्दीवर नियंत्रण करताना होणारी धावपळ आणि पुरेसे आणि वेळेवर जेवण न मिळणे यातून शारीरिक ताण-तणाव वाढणारे प्रत्येकी ४ (७.७%) उत्तरदाते आहेत. त्याचप्रमाणे शारीरिक तणावांचे प्रचंड व्याप आणि बदलणाऱ्या ड्युटी ही कारणे असणारे प्रत्येकी ३ (५.८%) उत्तरदाते आहेत. तर गार्ड ड्युटीच्या त्रासातून शारीरिक ताणतणाव वाढणारा १ उत्तरदाता आहे.

## ५. मानसिक ताण-तणाव : **(Psychological Stresses and Strains)**

सारणी क्र.४.५ मध्ये उत्तरदात्यांमध्ये पडणारे मानसिक ताण-तणाव दर्शविले आहेत.

सारणी क्र.४.५

उत्तरदात्यांवर पडणारे मानसिक ताण-तणाव

| अ.क्र. | ताण-तणाव | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ५२ | १००% |
| २. | नाही | - | - |
| | एकूण | ५२ | १००% |

सारणी क्र.४.५ वरून सर्वच उत्तरदात्या महिला पोलीसांवर मानसिक ताण-तणाव (१००%) पडतात असे उत्तर मिळाले.

## ६. कारणे : **(Reasons)**

सारणी क्र.४.६ मध्ये उत्तरदात्यांच्या मानसिक तणावाची कारणे दिली आहेत.

सारणी क्र.४.६

उत्तरदात्यांवर पडणाऱ्या मानसिक ताण-तणावांची कारणे

| अ.क्र. | कारणे | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | इच्छा नसताना पदार्पण. | ०१ | १.९% |
| २. | अनिश्चित कामाच्या वेळा. | ०४ | ७.७% |
| ३. | मुलांना वेळ न देणे. | ०२ | ३.८% |
| ४. | सभोवताली गुन्हेगारांचा वावर. | ०३ | ५.८% |
| ५. | वैयक्तिक अस्वास्थ्य. | ०२ | ३.८% |
| ६. | नाईट ड्युटीवेळी असुरक्षित, कधी कधी वाटते. | ०१ | १.९% |
| ७. | थर्ड डिग्रीचा वापर. | ०५ | ९.६% |
| ८. | अचानक मानसिकतेत बदल. | ०२ | ३.८% |
| ९. | खाकी परिधान करणे. | ०३ | ५.८% |
| १०. | वडिलधाऱ्यांचा या कामासाठी विरोध. | ०३ | ५.८% |
| ११. | एखाद्या अत्याचारित महिलेची केस. | ०३ | ५.८% |
| १२. | लोकांकडून येणारे वाईट अनुभव. | ०२ | ३.८% |
| १३. | नि.कक्षातील असमाधानकारक वातावरण. | ०३ | ५.८% |
| १४. | अजून लग्न नाही. | ०४ | ७.७% |
| १५. | विदारक दृश्य पाहणे. | ०३ | ५.८% |
| १६. | लोकांशी वाद. | ०१ | १.९% |
| १७. | पतीचा संशय. | ०३ | ५.८% |
| १८. | त्याच त्याच कामाचा त्रास/एकसारख्या ड्युटी. | ०६ | ११.५% |
| १९. | जास्त आवाजाच्या वाहनांचे नियंत्रण. | ०१ | १.९% |
| | एकूण | ५२ | १००% |

सारणी क्र.४.६ वरून बहुसंख्य उत्तरदात्यांवर एकसारखे तेच तेच काम ह्यामुळे मानसिक ताण-तणाव (११.५%) पडतात असे उत्तर मिळाले. उदा. मंदीर ड्युटी, रस्त्यावरील

पॉईंट ड्युटी, मोर्चे, सभा, दंगल काळात बंदोबस्त, न्यायालयीन ड्युटी, चौकी ड्युटी, तर काही उत्तरदात्यांवर थर्ड डिग्रीचा वापर (९.६%) केल्याने ताण-तणाव पडतात. काही उत्तरदात्यांच्या सांगण्यानुसार (७.७%) कामाच्या अनिश्चित वेळा यामुळे त्यांच्यात मानसिक ताणतणाव वाढीस लागत आहे. त्याचप्रमाणे खाकी परिधान करणे, एखाद्या अत्याचारित महिलेची केस, सभोवताली गुन्हेगारांचा वावर, वडीलधाऱ्यांचा 'पोलीस' या कामाला होणारा सततचा विरोध, नियंत्रण कक्षातील असमाधानकारक वातावरण, कधी कधी विदारक दृश्य पाहणे आणि पतीचा संशय अशी मानसिक ताणतणावांची कारणे सांगणारे प्रत्येकी ३ (५.८%) उत्तरदाते आहेत. तसेच मुलांना पाहिजे तितका वेळ देता न येणे, वैयक्तिक अस्वास्थ्य, लोकांकडून येणारे वाईट अनुभव, अचानक मानसिकतेत बदल ही कारणे असणारे प्रत्येकी २ (३.८%) उत्तरदाते आहेत. लोकांशी वाद, इच्छा नसताना पदार्पण आणि जास्त आवाज करणाऱ्या वाहनांचे आवाज (ट्रॅफिक पोलीस) नाईट ड्युटीवेळी कधी कधी असुरक्षित वाटणे असे कारण असणारा प्रत्येकी एक उत्तरदाता आहे.

तर सर्वांत गंभीर 'पोलीस' या व्यवसायात / नोकरीत असल्याने लग्न करण्यास सहजासहजी कोणीच तयार होत नाही. त्यामुळे अजून लग्न नाही. त्यामुळे मानसिक ताणतणाव वाढणारे प्रत्येकी ४ (७.७%) उत्तरदाते अविवाहीत आहेत.

''एस.एम. चन्नाबसवन्ना यांनी **"Mental Health Problem among Police Personnel"** या अभ्यासात बेंगलोर, धारवाड आणि दिल्ली येथील पोलीसांवरील मानसिक ताणतणाव आणि त्याची कारणे सांगितली आहेत. अतिरिक्त काम, अखंडपणे तासन्तास काम करणे, अपुऱ्या सुविधा आणि वरिष्ठांचा दबाव, होणारी छळवणूक अशी कारणे सांगितली आहेत.''[४] **(S. M. Channabassavanna : 1996 : 153)**

## ७. कौटुंबिक ताण-तणाव : **(Domestic Stresses and Strains)**

सारणी क्र.४.७ मध्ये उत्तरदात्यांवर पडणारे कौटुंबिक ताण-तणाव दर्शविले आहेत.

सारणी क्र.४.७

उत्तरदात्यांवर पडणारे कौटुंबिक ताण-तणाव

| अ.क्र. | ताण-तणाव | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ५२ | १००% |
| २. | नाही | - | - |
| | एकूण | ५२ | १००% |

सारणी क्र.४.७ वरून सर्वच उत्तरदात्या महिला पोलीसांवर कौटुंबिक ताण-तणाव (१००%) पडतात असे उत्तर मिळाले.

८. कौटुंबिक ताण-तणावाची कारणे :

सारणी क्र.४.८ मध्ये उत्तरदात्यांवर पडणाऱ्या ताण-तणावांची कारणे दर्शविली आहेत.

सारणी क्र.४.८

कौटुंबिक ताण-तणावांची कारणे

| अ.क्र. | कारणे | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | कौटुंबिक कलह | १५ | २८.८% |
| २. | कौटुंबिक जबाबदारी | ११ | २१.२% |
| ३. | आर्थिक समस्या | ०९ | १७.३% |
| ४. | घरच्यांचा या क्षेत्रात येण्यास अट्टाहास | ०१ | १.९% |
| ५. | आई आणि पोलीस भूमिका पार पाडताना त्रास | ०८ | १५.४% |
| ६. | कौटुंबिक जीवनापासून दूर | ०८ | १५.४% |
| | एकूण | ५२ | १००% |

सारणी क्र.४.८ वरून बहुसंख्य उत्तरदाते कौटुंबिक कलह (२८.८%) या कारणातून ताणतणाव वाढलेत हे सांगणारे आहेत. त्या खालोखाल कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडता येत नाही (२१.२%) असे सांगणारे आहेत. तर (१७.३%) आर्थिक समस्येतून तणाव वाढतात असे सांगणारे आहेत. त्यानंतर आई आणि पोलीस भूमिका पार पाडताना कसरत आणि कौटुंबिक जीवनापासून दूर यामुळे तणाव वाढतात असे प्रत्येकी (१५.४%) उत्तरदात्यांनी सांगितले. तर एका उत्तरदात्याने घरच्यांचा या क्षेत्रात येण्याचा आग्रह हे तणावाचे कारण सांगितले आहे. एकूण वरील सर्व कौटुंबिक अडचणी तणाव निर्मितीसाठी कारणीभूत आहेत.

याबाबत द.सा. साळगांवकर, आपले चरित्रात, 'एका पोलीस अधिकाऱ्याची डायरी' यात म्हणतात -

'सतत तणावाखाली, शिस्तीला आणि हुकुमाला बांधलेल्या अवस्थेत नोकरी करणाऱ्या पोलीसांच्या अडचणी आणि प्रश्नही खूप असतात.'(६)

(द.सा. साळगांवकर : २००५ : १८५)

माणूस म्हणून सर्वसामान्य पोलीस कर्मचाऱ्यांचे काही प्रश्न, अडचणी आहेत. पुष्कळ वेळा सलग चोवीस तास, अठ्ठेचाळीस तास काम करणारी, नोकरीवरही सतत कामाच्या ताणाखाली रगडली जाणारी ही माणसं (स्त्री/पुरूष) संसारी आहेत. त्यांनाही मुलं-माणसं, संसार आहेत, कौटुंबिक कर्तव्य आणि जबाबदाऱ्या आहेत.[७]

(द.सा. साळगांवकर : २००५ : १८४)

डॉ. रेखा पांडे आणि श्री. सुभाष जोशी यांच्या संशोधनावरून, 'महिला पोलीसांवर जास्त ताण हा कौटुंबिक जबाबदारीचा पडतो.'[८]

**(Dr. R. Pande and Shri. S. Joshi : Google Search)**

ब) 'पोलीस' (महिला व पुरूष) कर्मचाऱ्यांच्या गरजा :

प्रत्येक कर्मचाऱ्याच्या चार गरजा असतात. प्रत्येक कर्मचारी म्हणतो,

१. ''माझी पोटापाण्याची काळजी घ्या'' ही झाली त्याची आर्थिक गरज.

२. ''मला चांगली वागणूक द्या'' ही झाली त्याची हृदयाची गरज. या गरजेला भावनिक गरज असेही म्हणता येईल.

३. ''माझा चांगला वापर करून घ्या'' माणसाचा चांगला वापर त्याच्या मेंदूच्या साहाय्याने करता येतो. म्हणजे ही झाली त्याची मेंदूची गरज. या गरजेला मानसिक गरज असेही म्हणता येईल.

४. ''माझ्या सर्व प्रकारच्या क्षमतांचा समाज कल्याणासाठी वापर होऊ द्या'' अशी ही प्रत्येकाची आध्यात्मिक गरज असते.

प्रचलित पोलीस व्यवस्थापन पध्दतीमध्ये फक्त आर्थिक बाबींवर भर दिला जातो. म्हणजेच त्याच्या पोटापाण्याचा विचार होतो. इतर बाबींचा फारसा विचार होत नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांमधील पूर्ण कार्यक्षमतेचा वापर होत नाही. अशी बौध्दिक, शारीरिक कार्यक्षमता शेवटी वाया जाते.[९] (सुरेश खोपडे : २००३ : १९४-१९५)

९. संघटनात्मक (पोलीस) ताणतणाव :

**(Organisational Stresses and Strains)**

सारणी क्र.४.९ मध्ये उत्तरदात्यांवर पडणारे संघटनात्मक ताण-तणाव दर्शविलेले आहेत.

सारणी क्र.४.९

उत्तरदात्यांवर पडणारे संघटनात्मक ताण-तणाव

| अ.क्र. | ताण-तणाव | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ५२ | १००% |
| २. | नाही | - | - |
| | एकूण | ५२ | १००% |

सारणी क्र.४.९ वरून पोलीस दलातील काम करणाऱ्या सर्वांना या ना त्या प्रकारे अनेक कारणांनी आणि कमी-अधिक प्रमाणात संघटनात्मक ताण-तणावाला तोंड द्यावे लागते. असंरचित मुलाखत अनुसूचीद्वारे ५२ उत्तरदात्यांकडून संकलित केलेल्या माहितीवरून उत्तरदात्यांमध्ये (१००%) संघटनात्मक ताणतणाव दिसून आले.

१०. कारणे : **(Reasons)**

सारणी क्र.४.१.० मध्ये संघटनात्मक ताणतणावाची कारणे दर्शविली आहेत.

सारणी क्र.४.१.०

उत्तरदात्यांवर पडणाऱ्या संघटनात्मक ताण-तणावांची कारणे

| अ.क्र. | कारणे | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | पुरूष सहकाऱ्यांचा कामात हस्तक्षेप | ०७ | १३.५% |
| २. | कौशल्यास वाव न मिळणे | ११ | २१.२% |
| ३. | एकावरच सर्व जबाबदारी/दबाव | ०४ | ७.७% |
| ४. | हक्कांची कमतरता | ०५ | ९.६% |
| ५. | पक्षपात | ०३ | ५.८% |
| ६. | वैचारिक मतभेद | ०२ | ३.८% |
| ७. | पुरूष सहकाऱ्याशी वाद | ०७ | १३.५% |
| ८. | 'स्त्री' म्हणून कमी दर्जा | ०८ | १५.४% |
| ९. | अपुरे सहकार्य | ०५ | ९.६% |
| | एकूण | ५२ | १००% |

पोलीस कामकाजात कर्मचाऱ्यांना स्वायत्ता नसणे, आव्हान नसणे, व्यक्तिगत विकास, निश्चित जबाबदारी आणि प्रगतीबद्दल संधी नसते. थोडक्यात पोलीस कर्मचाऱ्यांच्या बौध्दिक क्षमतेचा फारच थोडा वापर केला जातो. आणि शारीरिक क्षमतेचा चुकीच्या दिशेने वापर केला जातो. ज्यातून संघटनात्मक ताण-तणावांची वाढ होत आहे.

सारणी क्र.४.१.० वरून कौशल्यास वाव न मिळणे या कारणातून संघटनात्मक ताणतणाव वाढणाऱ्या उत्तरदात्या महिला पोलीसांची संख्या (२१.२%) आहे. त्या खालोखाल महिला पोलीस असूनही 'स्त्री' म्हणून दिला जाणारा कमी दर्जा हे तणावाचे कारण असणारे (१५.४%) उत्तरदाते आहेत. त्याचप्रमाणे पुरूष सहकाऱ्यांचा कामात हस्तक्षेप आणि पुरूष सहकाऱ्याशी वाद अशी कारणे असणारे प्रत्येकी (१३.५%) उत्तरदाते आहेत. तर अपुरे सहकार्य आणि हक्कांची कमतरता ही कारणे असणारे प्रत्येकी ५ उत्तरदाते आहेत. कामाची वारंवार जबाबदारी एकाच व्यक्तीवर टाकली जाण्याने तणाव वाढणाऱ्यांची संख्या (७.७%) आहे. तर कामामध्ये, कर्तव्य पार पाडताना होणारा पक्षपात हे तणावाचे कारण असणारे (५.८%) उत्तरदाते आहेत. तसेच विचारांमध्ये मतभेद पडल्याने तणाव वाढणारे (३.८%) उत्तरदाते आहेत.

प्रशासनामध्ये काही पोलीस स्टेशन्स, काही शाखा, काही गावे ही केवळ काही मोजक्याच पोलीसांसाठीच आहेत. आपणाला त्यात आपले कौशल्य दाखविण्याची संधी कधीच मिळणार नाही. आपण असेच रिटायर होणार, ही भावना संतापाने काही महिला पोलीसांनी व्यक्त केली. थोडक्यात "पोलीस संस्कृतीतील मूल्यांशी स्त्री दीर्घकाळ समायोजन साधू शकत नाही."

अमरजित महाजन यांनी केलेल्या महिला पोलीसांच्या अभ्यासामध्ये त्यांना <u>संघटनात्मक</u> (पोलीस दल) <u>ताणतणावाची कारणे</u> दिसून आली. ते म्हणतात - संघटनात्मक औदासीन्य यामुळे 'स्त्री' ची महिला पोलीस ही भूमिका संदिग्ध अशा आहे त्याच स्थितीत आहे. समाजाची नकारात्मक प्रतिक्रिया/दृष्टीकोन, कमी जबाबदाऱ्या सुपुर्द करणे संघटनेत आपल्या अधिकाराचा दर्जा / क्षेत्र व्यापण्यासाठी कमी प्रमाणात मिळणाऱ्या संधी, कर्तव्यदक्ष म्हणून विरूध्द दिशेला असणारे पुरूष पोलीस या सर्वांचा भूमिका सादरीकरणात अनुकूल व्यवस्थेचा अभाव याचा परिणाम, पोलीस दलातील कर्तव्यदक्ष महिला पोलीसात ताणतणाव वाढणे हा होतो.[१०] **(Amarjit Mahajan : 1981 : 168)**

खोपडे, 'नवी दिशा .....' मध्ये म्हणतात, कोणत्याही पोलीस कर्मचाऱ्यांने आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याला मारलेला कडक सॅल्यूट पाहून सामान्य माणसाला वाटते की, पोलीस दलात फार चांगली शिस्त आहे. पण वरवर दिसणाऱ्या शिस्तीमध्ये बेशिस्त, अंतर्गत झगडे, राजकारण, गटबाजी, हेवेदावे अशा घटनांनी पोलीस स्टेशन पोखरून गेलेले असते. पण सामान्य माणसाच्या नजरेला दिसून येत नाही.[११] (खोपडे : १८५)

'पोलीस महासंचालक कार्यालयात अनेक वरिष्ठ पदे निर्माण केलेली असली तरी बरेचसे अधिकार काही विशिष्ट पदावरील अधिकाऱ्यांच्या हातात एकवटलेले दिसतात.'

पोलीस दलाचे कामकाज अधिकारशाही पध्दतीने चालते. अशा अधिकारशाही पध्दतीमुळे एकूण कामकाज निर्दयपणे दहशतवादाखाली करून घेतले जाते. एकांगीपणे अधिकाराचा वापर केला जातो. प्रत्येक कर्मचाऱ्याची व अधिकाऱ्याची जबाबदारी निश्चित करून त्यांना योग्य ते निर्णय घेण्याचे अधिकार दिलेले दिसत नाहीत. ध्येय गाठण्यासाठी आवश्यक त्या बांधीलकीचा अभाव असतो. कर्मचारी अगर अधिकारी यांना व्यक्तिगत प्रगतीसाठी संधी मिळत नाही. कर्मचाऱ्यांची व त्यांच्या करिअरची फारशी काळजी घेतलेली नसते. तसेच त्यांनी केलेल्या कामगिरीची योग्य दखल घेतली जात नाही.[१२]

(सुरेश खोपडे : २००३ : १६३)

क) महिला पोलीस आणि सामाजिक भूमिका :

**(Women Police and Social Role)**

* पोलीस हा आपल्या समाजाचा घटक आहे. एक माणूस म्हणूनही अन् गणवेशातही, पोलीस समाजाचे प्रतिबिंब आहे.[१३]

  (रिजवाना कश्यप 'दक्षता' : २००४ : ८)

* साधनात्मक भूमिका पार पाडण्याच्या व्यापक मागणीवर महिला पोलीसांच्या भूमिकेचे स्वरूप आणि रचना आधारित आहे.[१४]

  **(A. Mahajan : 1981 : 175)**

* महिला पोलीसांचा उपयोग प्रामुख्याने अल्पवयीन गुन्हेगारांना पकडणे, त्यांच्या गुन्ह्याचा शोध आणि चौकशी करणे, संशयीत व्यक्तिवर (स्त्री) लक्ष बाळगणे, तसेच लैंगिक गुन्हे, छळवणूक, हुंडाबळी, अपहरण उघडकीस आणणे या ठिकाणी होतो. आणि ही कामे महिला पोलीस पुरूषाप्रमाणे परिणामकारकरित्या करतात.[१५]

  **(S. K. Ghosh : 1981 : 141)**

* पोलीसांचे काम हे केवळ नोकरी नसून ते समाजाच्या, मानव जातीच्या कल्याणासाठी घेतलेलं सतीच वाण आहे. त्यामुळे नागरिक सुखा-समाधानाने आणि आनंदाने आपल्या कुटुंबीय आणि आप्तांबरोबर सण-समारंभ साजरे करीत असताना अगदी त्यावेळी पोलीस मागे आपल्या कुटुंबीय आणि आप्तांपासून दूर अंतरापर्यंत रात्रंदिवस दूर असतो. पोलीसांनी केलेल्या त्यागाला सीमा नसते. अहोरात्र २४ तास जनतेची सेवा करणारी ही एक मानवकल्याण संस्थाच आहे.[१६] ('दक्षता' : २००६ : ६९)

११. सामाजिक ताण-तणाव : **(Social Stresses and Strains)**

सारणी क्र.४.१.१ मध्ये उत्तरदात्यांवर पडणारे सामाजिक ताण-तणाव दर्शविले आहेत.

सारणी क्र.४.१.१

उत्तरदात्यांवर पडणारे सामाजिक ताण-तणाव

| अ.क्र. | ताण-तणाव | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ५२ | १००% |
| २. | नाही | - | - |
| | एकूण | ५२ | १००% |

सारणी क्र.४.१.१ नुसार सर्वच उत्तरदात्या महिला पोलीसांना (१००%) सामाजिक ताण-तणावांना तोंड द्यावे लागते.

१२. सामाजिक ताण-तणावाची कारणे : **(Reasons)**

सारणी क्र.४.१.२ मध्ये उत्तरदात्यांवर पडणाऱ्या सामाजिक ताण-तणावांची कारणे दर्शविली आहेत.

सारणी क्र.४.१.२

सामाजिक ताण-तणावांची कारणे

| अ.क्र. | कारणे | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | लोकांचा पाहण्याचा नकारात्मक दृष्टीकोन | १२ | २३.१% |
| २. | नको तितका राजकीय दबाव | ०५ | ९.६% |
| ३. | सण-उत्सवात इतर स्त्रियांप्रमाणे सहभागी होता येत नाही | ०७ | १३.५% |
| ४. | तपास कार्यात लोकांचा अडथळा | ०७ | १३.५% |
| ५. | लोकांकडून योग्य सन्मान न मिळणे | ११ | २१.२% |
| ६. | लोक पोलीस दलातील स्त्रीशी लग्न करण्यास तयार होत नाहीत | ०४ | ७.७% |
| ७. | सामाजिक जीवनापासून दूर | ०६ | ११.५% |
| | एकूण | ५२ | १००% |

सारणी क्र.४.१.२ वरून, बहुसंख्य उत्तरदात्यांमध्ये सामाजिक ताणतणाव वाढण्याचे कारण लोकांचा पोलीस दलाकडे पाहण्याचा नकारात्मक दृष्टीकोन (२३.१%) असे असून त्या खालोखाल लोकांकडून योग्य प्रतिसाद न मिळणे (२१.२%) हे कारण आहे. त्याचप्रमाणे इतर स्त्रियांप्रमाणे सण-उत्सवात सहभागी होता न येणे आणि लोकांनी पोलीस तपास कामात अडथळे निर्माण करणे अशी तणावाची कारणे असणारे प्रत्येकी ७ (१३.५%) उत्तरदाते आहेत. तर काही उत्तरदाते सामाजिक जीवनापासून दूर (११.५%) झाल्याने ताणतणावात वाढ झाल्याचे सांगतात. तर काहींनी राजकीय दबाव (९.६%) हे कारण सांगितले. तर काहींनी पोलीस दलातील एखाद्या मुलीशी लोक सहजासहजी पुढाकार घेत नाहीत असे कारण सांगितले.

प्रामुख्याने लोकांचा पोलीस दलाकडे पाहण्याचा नकारात्मक दृष्टीकोन संघटनात्मक ताणतणावास कारणीभूत असल्याचे दिसून येते. या विविध ताण-तणावांचा अनेकांनी अभ्यास केला. तो पुढीलप्रमाणे -

* महाजन यांच्या **"Indian Police Women"** या अभ्यासात, समाजाकडून महिला पोलीसांना नकारात्मक मान्यता मिळते आणि त्यांना 'वाईट' वागणूक मिळते असे दिसून आले.' [१७] **(A. Mahajan : 1981 : 177)**

एकूण महिला पोलीसांना विविध प्रकारच्या ताणतणावांना तोंड द्यावे लागते.

* **R.C.Tripathi, R. K. Naidu, K. Thapa and S. N. Biswas** यांच्या संशोधनानुसार, उत्तर प्रदेशातील पोलीसांना विविध प्रकारच्या ताणतणावांना तोंड द्यावे लागते आणि कारणे विविध आहेत असे सांगितले. त्यांनी सांगितल्याप्रमाणे -

  'कामाचे अनिश्चित तास, रजेची समस्या, <u>सामाजिक जीवन जगता न येणे,</u> बढती नसणे, कुटुंबाकडे दुर्लक्ष आणि विभक्त, जीवनामध्ये जोखीम, सरकारचा पाठिंबा नसणे, अपुरी रचना, अधिकाऱ्यांचाा दबाव, <u>राजकीय दबाव,</u> वारंवार होणाऱ्या बदल्या, ऑफिसरचा दृष्टीकोन, मुलांचे शिक्षण, अपुरे जेवण, कमी पगार या सर्वांचा परिणाम ताण वाढण्यामध्ये होतो. ज्याचा परिणाम त्यांच्या <u>भूमिका सादरीकरणावर</u> होतो.'[१८] **(R.C.Tripathi, R. K. Naidu, K. Thapa and S. N. Biswas : 1993 : 120)**

ड) महिला पोलीसांवर पडणाऱ्या ताणतणावांचे परिणाम : **(Impact)**

कुटुंबाकडे दुर्लक्ष, मुलांची काळजी, बदली, सारखे प्रवास, संप, निवडणूका, मोर्चे, विविध प्रकारचे बंदोबस्त, दंगल, राजकीय नेत्यांचे दौरे, अपुऱ्या सुट्ट्या, अपुऱ्या सुविधा या सर्वांचे पडणारे शारीरिक, मानसिक, सामाजिक, कौटुंबिक आणि संघटनात्मक ताणतणाव, यांचे महिला पोलीसांच्या आरोग्यावर विविध प्रकारचे परिणाम दिसून आले.

१३. ताणतणावांचे परिणाम : **(Impact of Stresses and Strains)**

सारणी क्र.४.१.३ मध्ये उत्तरदात्यांवर पडणाऱ्या ताण-तणावांचे परिणाम दर्शविले आहेत.

सारणी क्र.४.१.३

ताण-तणावांचे परिणाम

| अ.क्र. | परिणाम | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अंगदुखी | ०८ | १५.४% |
| २. | श्वसनाचे त्रास | ०१ | १.९% |
| ३. | मानसिकतेत बदल | १४ | २६.९% |
| ४. | रक्तदाब | ०६ | ११.५% |
| ५. | व्यसनाची इच्छा | ०४ | ७.७% |
| ६. | अर्वाच्छ भाषेचा वापर | ०५ | ९.६% |
| ७. | नोकरी सोडण्याची इच्छा | ०४ | ७.७% |
| ८. | इतर आजार | ०९ | १७.३% |
| ९. | व्यसन करणे | ०१ | १.९% |
| | एकूण | ५२ | १००% |

कोल्हापूर शहराच्या रक्षणाच्या, संरक्षणाच्या माध्यमातून कोल्हापूर पोलीस दलात कार्यरत असणाऱ्या महिला पोलीसांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. अनेक शारीरिक, मानसिक परिणामांना तोंड द्यावे लागत आहे.

कोल्हापूर शहरातील महिला पोलीसांचा अभ्यास करताना एक गोष्ट निदर्शनास आली, ती म्हणजे कोल्हापूर पोलीस दलात महत्त्वाची भूमिका पार पाडणाऱ्या महिला पोलीसांचा आरोग्य दर्जा फारसा समाधानकारक नाही. त्यांचा आरोग्य दर्जा खालवण्याची कारणे पुढीलप्रमाणे :-

सारणी क्र.४.१.३ नुसार

१. अंगदुखी : **(Body Pains)**

(१५.४%) उत्तरदात्यांना डोकेदुखी, पाठदुखी, सतत तासन्तास पहाऱ्याची कामे करणाऱ्या महिलांमध्ये पायदुखी, कंबरदुखी, डोळे दुखी त्याचप्रमाणे थकवा, पॉईंट ड्युटी

करणाऱ्या आणि शहर वाहतूक नियंत्रणाचे काम करणाऱ्या महिला पोलीसांमध्ये सतत कानावर पडणाऱ्या कर्कश आवाजामुळे कानदुखीचा त्रास होतो असे उत्तर मिळाले. त्याचप्रमाणे मासिक पाळी काळात सतत मोर्चे, बंदोबस्तासाठी कामे करणाऱ्या उत्तरदात्यांमध्ये हातापायात मुंग्या येऊन अंग दुखणे, पाय सुजणे असे परिणाम दिसून येतात.

२. रक्तदाब : **(Blood Pressure)**

(११.५%) उत्तरदात्यांमध्ये उच्च रक्तदाब / कमी रक्तदाब असे परिणाम दिसून आलेत. त्याची कारणे कौटुंबिक ताण, शारीरिक ताण असे सांगितले.

३. मानसिकतेत बदल : **(Psychological Changes)**

(२६.९%) उत्तरदात्यांच्या मानसिकतेत बदल झाला आहे. या सर्व ताण-तणावातून समायोजन करताना उत्तरदात्यांच्या मानसिकतेत बदल झाला आहे. काहींचा स्वभाव बदलला आहे, कणखरता आली आहे. खाकीचा सतत वापर (पोशाख) त्यामुळे चालण्यात बदल झाला आहे. त्यातून पुरूषांसारखे चालण्याचा बदल झाला आहे. तर वरिष्ठ महिला अधिकाऱ्यांची गुन्हेगाराकडून गुन्हा कबूल करून घेताना थर्ड डिग्रीचा वापर के ला जातो. त्यावेळी मानसिकता बदलते. उदा. अचानक राग, आक्रमकता, तडफदारपणा नसानसात भिनतो असे उत्तर मिळाले.

४. इतर आजार / व्याधी : **(Other Disease)**

(१७.३%) उत्तरदात्यांमध्ये काहींना अपुरे आणि वेळेवर जेवण न मिळणे, त्यामुळे रक्ताची कमतरता झाल्याने 'ॲनिमिया' सारखी व्याधी जडली आहे. प्रामुख्याने वाहतूक पोलीसांमध्ये मोठमोठे कर्कश वाहनांचे आवाज, रहदारीवर नियंत्रण यातून कमी ऐकू येणे, घशाचा त्रास अशी व्याधी जडली आहे. त्याचप्रमाणे काहींना अर्धशिशी, कधी तरी चक्कर, हृदयविकार, निद्रानाश, काहींना मधुमेह, अपचन, जळजळणे, पित्ताचा त्रास, 'स्पॉन्डिलाइटिस' (मणक्याच्या हाडाची सूज), कधी कधी आतड्याला सूज येणे अशा व्याधी जडल्या आहेत. त्याचप्रमाणे वारंवार प्रवास, अपुरे पाणी पिणे यातून मुत्रपिंडाला सूज येणे, मुतखडा, फिशर इत्यादी.

५. अर्वाच्च / अश्लील भाषेचा वापर होणे: **(Use of Indecent Language)**

(९.६%) उत्तरदात्यांकडून असे उत्तर मिळाले. त्यांच्या सांगण्यानुसार एखादी अत्याचाराला बळी पडलेल्या स्त्रिया वारंवार विनंती करूनही सत्य परिस्थिती काय आहे, ते सांगत नाही. एखादा गुन्हेगार उलट बोलणे, कायद्यांचा काही लोकांकडून होणारा अपमान,

कधी कधी लोकांकडून कायदा हातात घेणे, स्त्रीयांवर अत्याचार करणारी, त्यांना कमी लेखणारी माणसे यांनी तपासात अरेरावीपणा करणे, विविध प्रकारचे पहारे, लोकांनी कायदा हातात घेणे, कधी कधी स्वत: मधील परिस्थितीला तोंड देण्याची क्षमता संपते, अशावेळी नकळत चीड येऊन तोंडावरचा ताबा सुटतो असे उत्तरदात्यांकडून सांगण्यात आले.

६. व्यसनाची इच्छा होणे : **(To desire addiction)**

४ (७.७%) उत्तरदात्यांनी व्यसनाची फक्त इच्छा होते, पण प्रत्यक्षात तसे काही करत नाही असे सांगितले.

७. नोकरी सोडण्याची इच्छा : **(To feel quit from job)**

४ (७.७%) उत्तरदात्यांनी नोकरी सोडण्याची इच्छा होते, असे सांगितले.

८. श्वसनाचा त्रास : **(Annoyance of respiratory)**

१ (१.९%) उत्तरदात्या वाहतूक शाखेतील महिला पोलीस यांनी वाहतुकीची कोंडी, निरनिराळ्या वाहनांचे धूर यामुळे श्वसनाचा त्रास झाला आहे असे सांगितले.

९. व्यसन करते : **(To have an addiction)**

१ (१.९%) एकूण उत्तरदात्यांपैकी फक्त १ उत्तरदात्या महिला पोलीस यांनी व्यसन करते असे सांगितले.

एकूण महिला पोलीस उत्तरदाते यांनी एवढ्या सर्व परिणामांना तोंड देता देता, आपला संघर्ष चालू ठेवला आहे.

एकूण 'पोलीस' व्यवस्थेतील 'पोलीस' (स्त्री/पुरूष) या घटकाचा त्यांच्यावर होणाऱ्या परिणाम जाणून घेण्याचा प्रयत्न अनेकांनी केला आहे.

* रिजवाना कश्यप म्हणतात, <u>चौकीवरला पोलीस चिडचिडा कां होतो?</u> हर्षदा मेहता – सारख्याच्या जिवाला धोका म्हणून त्याला पोलीस संरक्षण. तो पंचतारांकित हॉटेलमध्ये जेवत असताना त्याला संरक्षण देणारी 'पोलीस' माणस बाहेर उपाशी ताटकळत असतात.[११] (रिजवाना कश्यप : २००४ : ८)

* 'तरूण भारत' या वृत्तपत्रात <u>'पोलीसांच्या रजेत 'अतिरिक्त' कामाचे विघ्न'</u> या शीर्षकाखाली पोलीसांवर पडणाऱ्या ताणतणावाचे परिणाम स्पष्ट केले आहेत. ते पुढीलप्रमाणे :-

वारंवार रद्द होणाऱ्या सुट्ट्या, कामाचे अनियमित तास आणि अतिरिक्त ड्युटीमुळे पोलीस रक्तदाब, मधुमेह तसेच हृदयविकाराचे बळी पडू लागले आहेत. कामाच्या अतिरिक्त ताणाच्या नैराश्यातून पोलीसांकडून आत्महत्येबरोबरच वरिष्ठ अधिकाऱ्यावर जीवघेणा हल्ला करण्याचे प्रकार वाढत आहे.

मोर्चे, आंदोलने, दंगल, लुटमार आणि राजकीय नेते व महत्वाच्या शासकीय अधिकाऱ्यांचे दौरे यामुळे पोलीसांवर कामाचे प्रचंड दडपण असते. अपुऱ्या कर्मचारी संख्येमुळे एखाद्या पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांनी या काळात आजारी पडायचे नाही, अशी स्थिती आहे.

एखाद्या अधिकाऱ्याने, कर्मचाऱ्याने वरिष्ठांकडे रजेसाठी अर्ज केल्यास त्यावर तात्काळ अंमलबजावणी होत नसल्याची स्थिती आहे. एखादा कर्मचारी रजा मागण्यास गेला तर त्याला थेट पोलीस उपअधिक्षक, जिल्हा पोलीस प्रमुखांच्या कार्यालयाचा रस्ता दाखविला जातो. त्याचाच परिणाम पोलीसांच्या कामावर होऊ लागला आहे.[२०]

(तरूण भारत : ८ फेब्रुवारी, २००७ : १)

* माणिक माने यांच्या अभ्यासावरून गुन्ह्यांचा तपास, बंदोबस्त, शांतता व सुव्यवस्था राखणे या मोघम शब्दापलीकडे सर्वसामान्य नागरिकांना फारसे माहीत नसते. पण रोजची दैनंदिन कामे आणि त्यांचे स्वरूप उदा. ठाणे अंमलदार, वाहतूक नियंत्रण, अपघात, सांप्रदायिक हिंसाचार, मोठमोठे बंदोबस्त, गुप्तवार्ता, सातत्याने होणारे प्रवास या सगळ्याचा येणारा शारीरिक, मानसिक थकवा हा मद्यपानाला पोषक पार्श्वभूमी तयार करतो.[२१]

(माणिक माने 'दक्षता' १९९८ : ४०)

* **S. K. Ghosh** यांनी केलेल्या **"Women in Policing"**, या अभ्यासामध्ये, महिला पोलीस मुलांची काळजी आणि इतर कौटुंबिक कारणे यातून स्वेच्छा निवृत्ती घेतात असे दिसून आले.[२२] (**S. K. Ghosh : 1981 : 139**)

अशा अनेक परिणामांचा, समस्यांचा सामना महिला पोलीसांना करावा लागतो.

टीप : प्रशासकीय जबाबदारी, कर्तव्ये, प्रशासकीय गुप्तता, उत्तरदात्यांचा मुलाखतीसाठी मिळणारा कमी अवधी, त्यांच्यावर पडणारी इतर प्रशासकीय बंधने इत्यादींमुळे महिला पोलीस उत्तरदात्यांकडून सर्व समस्यांचा खुलासा करून घेणे एक आव्हान होते. त्यासाठी त्यांच्या समस्या अपेक्षा स्वरुपात जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

२. महिला पोलीसांच्या अपेक्षा :

संरचित मुलाखत अनुसूचीद्वारे ५२ उत्तरदात्या महिला पोलीसांच्या सरकारकडून, अधिकारी वर्गाकडून, पुरूष सहकाऱ्यांकडून, स्त्री सहकाऱ्यांकडून, समाजाकडून, समाजातील 'स्त्री' वर्गांकडून असणाऱ्या अपेक्षा जाणून घेतल्या.

महिला पोलीसांवर पडणारे विविध ताण-तणाव आणि त्यांच्या अपेक्षा यांचा जवळचा संबंध आहे.

१४. सरकारकडून अपेक्षा : **(Expectation from Government)**

सारणी क्र.४.१.४ मध्ये उत्तरदात्या महिला पोलीसांच्या सरकारकडून असणाऱ्या अपेक्षा दर्शविल्या आहेत.

सारणी क्र.४.१.४

उत्तरदात्यांच्या सरकारकडून असणाऱ्या अपेक्षा

| अ.क्र. | अपेक्षा | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | बढती. | ०२ | ३.८% |
| २. | पगार वाढ. | ०४ | ७.७% |
| ३. | नियमित रजा. | ०६ | ११.५% |
| ४. | आरोग्यविषयक सुविधात वाढ. | ०५ | ९.६% |
| ५. | स्वच्छतागृहांची उपलब्धता. | ०६ | ११.५% |
| ६. | मॅटर्निटी लिव्ह वाढवावी. | ०३ | ५.८% |
| ७. | बंदोबस्ताची कामे कमी मिळावीत. | ०९ | १७.३% |
| ८. | वाहनाची उपलब्धता. | ०४ | ७.७% |
| ९. | पोलीस संख्येत वाढ. | ०४ | ७.७% |
| १०. | जादा रेल्वे पोलीसांची वाढ. | ०१ | १.९% |
| ११. | मुख्यालयात पाळणागृहाची उपलब्धता. | ०२ | ३.८% |
| १२. | राखीव कक्ष. | ०३ | ५.८% |
| १३. | पो.वसाहतीत वाढ. | ०३ | ५.८% |
| | एकूण | ५२ | १००% |

सारणी क्र.४.१.४ वरून बहुसंख्य उत्तरदात्यांनी निरनिराळे नेते यांचे दौरे तसेच इतर विविध दौरे यामुळे वाढणारे बंदोबस्त (१७.३%) अशी कामे कमी मिळावीत अशी अपेक्षा व्यक्त केली. तर नियमित रजा मिळाव्यात आणि स्वच्छतागृहांची उपलब्धता व्हावी असे प्रत्येक ६ (११.५%) उत्तरदात्यांनी सांगितले. तसेच पगारवाढ व्हावी, पोलीसांची संख्या वाढवावी आणि वाहनांची उपलब्धता जास्त प्रमाणात व्हावी असे प्रत्येकी ४ (७.७%) उत्तरदात्यांनी सांगितले. पोलीस घरांची माफक सुविधा, मॅटर्निटी लिव्ह वाढवून मिळावी, महिलांसाठी खास एक राखीव कक्ष असावा असे प्रत्येकी ३ (५.८%) उत्तरदात्यांनी सांगितले. तर बढती मिळावी, त्याचप्रमाणे मुख्यालयात पाळणागृहाची उपलब्धता करावी असे प्रत्येकी २ (३.८%) उत्तरदात्यांनी सांगितले. एका उत्तरदात्या रेल्वे महिला पोलीस यांनी जादा रेल्वे पोलीसांची नेमणूक करावी अशी अपेक्षा सांगितली. 'वरील अपेक्षांचा विचार करता महिला पोलीसांना मिळणाऱ्या सुविधांची स्थिती फारशी समाधानकारक नाही.'

रिजवाना कश्यप 'मंथन' मध्ये म्हणतात, पोलीस चौकीत कित्येकदा प्रसाधनगृह नसतं. लेडी कॉन्स्टेबलला तिथे कपडे बदलायला जागा नसते अन् तिथूनच एखाद्या स्त्री गुन्हेगाराला कुठे बाहेरगावी घेऊन जाण्याची ऑर्डर आली तर साधे लघुशंकेलाही जाता येत नाही.[२३] (रिजवाना कश्यप : 'मंथन' २००४ : ८)

## १५. अधिकारी वर्गाकडून अपेक्षा :(Expectations from Male Senior Officers)

सारणी क्र.४.१.५ मध्ये उत्तरदात्यांच्या पुरूष अधिकाऱ्यांकडून असणाऱ्या अपेक्षा दर्शविल्या आहेत.

सारणी क्र.४.१.५

उत्तरदात्यांच्या अधिकारी वर्गाकडून असणाऱ्या अपेक्षा

| अ.क्र. | अपेक्षा | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | कामाचे कौतुक व्हावे | १२ | २३.१% |
| २. | नाईट ड्युटीज कमी करणे | १२ | २३.१% |
| ३. | अधिकार मिळावेत | ११ | २१.२% |
| ४. | अनावश्यक गोष्टींचा दबाव नसावा | ०६ | ११.५% |
| ५. | गरोदर स्त्रीला कमी जोखमीची कामे द्यावीत. | ०३ | ५.८% |
| ६. | शहरातील ड्युटी मिळाव्यात | ०५ | ९.६% |
| ७. | अपेक्षा नाहीत | ०३ | ५.८% |
| | एकूण | ५२ | १००% |

सारणी क्र.४.१.५ नुसार कामाचे कौतुक व्हावे आणि नाईट ड्युटीजचे प्रमाण कमी असावे अशी अपेक्षा सांगणारे उत्तरदाते महिला पोलीस प्रत्येकी (२३.१%) आहेत. त्या खालोखाल अधिकार मिळावेत (२१.२%) अशी उत्तरदात्यांची अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे अनावश्यक कामाचा दबाव नसावा (११.५%), नाईट ड्युटीज् शहरी भागातच मिळाव्यात (९.६%), आणि गरोदर स्त्रीला कमी जोखमीची कामे उदा. बंदोबस्त, इतर पहारे, कोट ड्युटी देऊ नयेत (५.८%) अशा अपेक्षा उत्तरदात्यांनी सांगितल्या.

तर (५.८%) उत्तरदात्यांनी अधिकारी वर्गाकडून काही अपेक्षा नसल्याचे सांगितले.

१६. पुरूष पोलीस सहकाऱ्याकडून अपेक्षा : **(Expectations from Male Colleague)**

सारणी क्र.४.१.६ मध्ये उत्तरदात्या महिला पोलीसांच्या पुरूष सहकाऱ्यांकडून असणाऱ्या अपेक्षा दर्शविल्या आहेत.

सारणी क्र.४.१.६

उत्तरदात्यांच्या पुरूष सहकाऱ्याकडून असणाऱ्या अपेक्षा

| अ.क्र. | अपेक्षा | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | सहकार्य मिळावे. | १० | १९.२% |
| २. | सन्मान मिळावा. | १४ | २६.९% |
| ३. | पुरूषी अहंकार दूर ठेवणे. | ०६ | ११.५% |
| ४. | नाईट ड्युटीवेळी मानसिक आधार मिळावा. | ०९ | १७.३% |
| ५. | प्रामाणिकपणे काम करावे. | ०७ | १३.५% |
| ६. | महिलांचा आत्मविश्वास वाढवावा. | ०३ | ५.८% |
| ७. | पोलीस दलाचा दर्जा वाढविण्यास प्रयत्नशील रहावे. | ०२ | ३.८% |
| ८. | अपेक्षा नाहीत . | ०१ | १.९% |
| | एकूण | ५२ | १००% |

सारणी क्र.४.१.६ नुसार बहुसंख्य उत्तरदात्यांनी (२६.९%) सन्मान मिळावा ही अपेक्षा व्यक्त केली आहे.आहेत. त्या खालोखाल नाईट ड्युटीवेळी मानसिक आधार (१७.३%) सहकार्य मिळावे (१९.२%) असे काही उत्तरदात्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे आपले काम प्रामाणिकपणे करावे (१३.५%) असे तर पुरूषी अहंकार सोडावा असे (११.५%) उत्तरदात्यांनी सांगितले. स्त्रियांमधील आत्मविश्वास वाढवावा (५.८%) आणि पोलीस दलाचा दर्जा वाढविण्यास प्रयत्नशील रहावे असे (३.८%) उत्तरदात्यांनी सांगितले.

केवळ १ उत्तरदात्याने पुरूष सहकाऱ्याकडून अपेक्षा नाहीत असे सांगितले.

वरील सर्व अपेक्षांचा विचार करता आजही महिला पोलीस आणि त्यांचे पुरूष सहकारी यांचे संबंध फारसे विकसित झालेले नाहीत असे सूचित होते.

## १७. अपेक्षा, महिला पोलीस सहकाऱ्याकडून अपेक्षा :

## (Expectations from Female Colleague)

सारणी क्र.४.१.७ मध्ये उत्तरदात्या महिला पोलीसांच्या महिला सहकाऱ्यांकडून असणाऱ्या अपेक्षा दर्शविल्या आहेत.

सारणी क्र.४.१.७

उत्तरदात्यांच्या महिला सहकाऱ्याकडून असणाऱ्या अपेक्षा

| अ.क्र. | अपेक्षा | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | कामात सहकार्य | १० | १९.२% |
| २. | मानसिक आधार | १३ | २५.०% |
| ३. | पुढाकार घ्यावा | ०४ | ७.७% |
| ४. | अपेक्षा नाहीत | २५ | ४८.१% |
| | एकूण | ५२ | १००% |

सारणी क्र.४.१.७ वरून बहुसंख्य उत्तरदात्यांच्या (४८.१%) आपल्या महिला सहकाऱ्यांकडून अपेक्षा नाहीत. तर (१९.२%) उत्तरदात्यांनी कामात सहकार्य करावे, (२५%) उत्तरदात्यांनी मानसिक आधार मिळावा आणि (७.७%) उत्तरदात्यांनी स्वत:हून पुढाकार घ्यावा अशा अपेक्षा व्यक्त केल्या आहेत.

१८. समाजातील लोकांकडून अपेक्षा :

**(Expectations from People of Society)**

सारणी क्र.४.१.८ मध्ये उत्तरदात्या महिला पोलीसांच्या समाजातील लोकांकडून असणाऱ्या अपेक्षा दर्शविल्या आहेत.

सारणी क्र.४.१.८

उत्तरदात्यांच्या समाजातील लोकांकडून असणाऱ्या अपेक्षा

| अ.क्र. | अपेक्षा | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | पोलीसांना मित्र समजावे | ०४ | ७.७% |
| २. | पोलीसांना सन्मान द्यावा | २० | ३८.५% |
| ३. | समस्या पोलीसांपर्यंत आणणे | ०३ | ५.८% |
| ४. | बेकायदेशीर कामाची अपेक्षा नसावी | १० | १९.२% |
| ५. | कायद्याच्या मर्यादा राखणे | ०७ | १३.५% |
| ६. | तपासात सहकार्य करावे | ०७ | १३.५% |
| ७. | वाहतुकीचे नियम पाळून सहकार्य | ०१ | १.९% |
| | एकूण | ५२ | १००% |

सारणी क्र.४.१.८ वरून बहुसंख्य उत्तरदात्या (३८.५%) महिला पोलीसांनी समाजातील लोकांकडून सन्मानाची अपेक्षा केली आहे. तर (१९.२%) उत्तरदात्यांनी कोणत्याही पोलीसांकडून (स्त्री व पुरूष) बेकायदेशीर कामाची अपेक्षा करू नये अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. त्यानंतर कायद्याच्या मर्यादा सांभाळणे, तपासात सहकार्य करणे अशी अपेक्षा प्रत्येकी ७ (१३.५%) उत्तरदात्यांनी व्यक्त केली. (७.७%) पोलीसांच्या सांगण्यानुसार लोकांनी पोलीसांना शत्रू न समजता मित्रत्वाच्या नात्याने वागावे, तर (५.८%) उत्तरदात्यांनी लोकांनी आपल्या समस्या पोलीसांपर्यंत मांडाव्यात असे सांगितले.

एका उत्तरदात्या वाहतूक नियंत्रण शाखेतील पोलीस शिपाई यांनी लोकांनी वाहतुकीचे नियम पाळावेत आणि पोलीसांना सहकार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. ज्याप्रमाणे समाज पोलीसांकडून अपेक्षा व्यक्त करतो, त्याप्रमाणे पोलीसही समाजाकडून काही अपेक्षा करणे स्वाभाविक आहे.

* Society for Participatory Research in Asia (PRIA) यांच्या संशोधनात, पोलीसांच्या समाजातील लोकांकडून असणाऱ्या अपेक्षा व्यक्त केल्या, त्या पुढीलप्रमाणे :-

'पोलीसांवर विश्वास ठेवावा आणि त्यांना शत्रू न समजता मित्रत्वाच्या नात्याने वागावे, गुन्ह्यासंबंधीत माहिती पुरवून सहकार्य करावे, 'पोलीस' दलाच्या मर्यादा समजून घ्याव्यात.'[२४] **(PRIA : 2001 : 203)**

* **Joshi G. P.** यांच्या **'Police Public Interface' (2001)** या अभ्यासावरून पोलीसांमध्ये त्यांच्या कामाविषयी वाटणाऱ्या असमाधानाचे कारण समाजातील लोकांचा, जनतेचा पोलीसांवरील अविश्वास हेच आहे. **(Joshi G. P. : 2001 : 190)**[२५]

## १९. समाजातील स्त्री वर्गाकडून अपेक्षा :

## (Expectations from Women Class in Society)

सारणी क्र.४.१.९ मध्ये उत्तरदात्यांच्या स्त्री वर्गाकडून असणाऱ्या अपेक्षा दर्शविल्या आहेत.

सारणी क्र.४.१.९

उत्तरदात्यांच्या स्त्री वर्गाकडून असणाऱ्या अपेक्षा

| अ.क्र. | अपेक्षा | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | आपल्या समस्या मांडाव्यात. | ०६ | ११.५% |
| २. | सण, उत्सव, घरगुती कार्यक्रम यात म.पो.सहभागी करून घेणे. | १५ | २८.८% |
| ३. | स्त्री म्हणून समजून घ्यावे. | १८ | ३४.६% |
| ४. | तपासात सहकार्य करावे. | ०३ | ५.८% |
| ५. | वृत्ती संकुचित नसावी. | १० | १९.२% |
| | एकूण | ५२ | १००% |

सारणी क्र.४.१.९ वरून बहुसंख्य उत्तरदात्यांनी (३४.६%) महिला पोलीस ही एक 'स्त्री' च आहे या भावनेने तिला समजून घ्यावे अशी समाजातील स्त्री वर्गाकडे अपेक्षा व्यक्त केली. त्याप्रमाणे काही उत्तरदात्यांनी (२८.८%) महिला पोलीसांना सण, उत्सव,

घरगुती कार्यक्रम उदा. हळदी-कुंकू अशा कार्यक्रमात सहभागी करून घ्यावे, अशी अपेक्षा सांगितली. त्या खालोखाल 'स्त्री' वर्गाने संकुचित वृत्ती ठेवू नये (१९.२%) असे तर काहींनी (११.५%) स्त्रियांनी आपल्या समस्या महिला पोलीसांपर्यंत आणाव्यात/मांडाव्यात असे सांगितले. (५.८%) उत्तरदात्या महिला पोलीसांनी तपास कार्यात समाजातील 'स्त्री' वर्गाने सहकार्य करावे असे सांगितले.

या व अशा अनेक अपेक्षेतून उत्तरदात्या महिला पोलीसांच्या अनेक अपेक्षा समोर येतात. ज्यामुळे तिच्यात अनेक शारीरिक, मानसिक, संघटनात्मक आणि सामाजिक ताणतणावांची वाढ झाली आहे.

२०. आवडता विभाग : **(Favourite Section)**

सारणी क्र.४.२.० मध्ये उत्तरदात्यांचा आवडता विभाग दर्शविला आहे.

सारणी क्र.४.२.०

उत्तरदात्यांचा आवडता विभाग

| अ.क्र. | आवडता विभाग | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ऑफिस काम | १६ | ३०.८% |
| २. | बिनतारी यंत्रणा | ०६ | ११.५% |
| ३. | मानवी हक्क निवारण | ०२ | ३.८% |
| ४. | ग्राऊंड ड्युटी | ०१ | १.९% |
| ५. | महिला अत्याचार निवारण | ०४ | ७.७% |
| ६. | गुन्हा अन्वेषण | ०९ | १७.३% |
| ७. | सायबर क्राईम | ०२ | ३.८% |
| ८. | मोटर परिवहन | ०२ | ३.८% |
| ९. | कुठेही / कोणताही विभाग | ०५ | ९.६% |
| १०. | परेड ड्युटी | ०३ | ५.८% |
| ११. | वाहतूक नियंत्रण | ०२ | ३.८% |
|  | एकूण | ५२ | १००% |

सारणी क्र.४.२.० वरून बहुसंख्य उत्तरदात्या महिला पोलीसांनी (३०.८%) ऑफिस काम आणि (११.५%) उत्तरदात्यांनी बिनतारी संदेश यंत्रणा अशा बैठे काम असणाऱ्या विभागांना प्राधान्य दिले आहे. तर गुन्हा अन्वेषण विभागाला (१७.३%) उत्तरदात्यांनी प्राधान्य दिले आहे. कोणत्याही विभागात काम करणे आवडते असे (९.६%) उत्तरदात्यांनी सांगितले. तसेच (७.७%) उत्तरदात्यांनी महिला अत्याचार निवारण कक्षाला पसंती दिली आहे. (५.८%) उत्तरदात्यांना कवायत निर्देशन विभाग (परेड ड्युटी) आवडतो असे उत्तर मिळाले. त्यानंतर मानवी हक्क निवारण, सायबर क्राईम, मोटार परिवहन आणि वाहतूक नियंत्रण शाखेला प्रत्येक २ (३.८%) उत्तरदात्यांनी पसंती दर्शविली आहे. एका उत्तरदात्याने ग्राऊंड ड्युटीला पसंती दर्शविली आहे.

बैठे काम असणाऱ्या विभागाला महिलांनी पसंती दर्शविली आहे.

२१. भूमिकेविषयी दृष्टिकोन : **(Attitude)**

सारणी क्र.४.२.१ मध्ये उत्तरदात्यांचा भूमिकेविषयीचा दृष्टीकोन दर्शविला आहे.

सारणी क्र.४.२.१

उत्तरदात्यांचा भूमिके विषयीचा दृष्टिकोन

| अ.क्र. | दृष्टिकोन | वारंवारिता | टक्के वारी |
|---|---|---|---|
| १. | सकारात्मक | ४५ | ८६.५% |
| २. | नकारात्मक | ०६ | ११.५% |
| ३. | आव्हानात्मक | ०१ | १.९% |
| | एकूण | ५२ | १००% |

सारणी क्र.४.२.१ वरून बहुसंख्य उत्तरदाते आपल्या महिला पोलीस या भूमिकेला सकारात्मक (८६.५%) दृष्टीकोनातून पाहतात. तर (११.५%) नकारात्मक दृष्टीकोनातून पाहतात. एका उत्तरदात्याला आपली भूमिका आव्हानात्मक वाटते.

* **Dr. Singh** यांच्या मते, कामाच्या ठिकाणची अनुकूल परिस्थिती पोलीसांमध्ये कामाची परिणामकारकता आणि कार्यक्षमता वाढविते.[२६] **(Dr. Singh : 2001 : 235)**

२२. महत्वाकांक्षा/ध्येय : **(Ambition)**

सारणी क्र.४.२.२ मध्ये उत्तरदात्यांच्या महत्वाकांक्षा/ध्येय दर्शविले आहे.

सारणी क्र.४.२.२

उत्तरदात्यांची महत्वाकांक्षा/ध्येय

| अ.क्र. | महत्वाकांक्षा | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | समाजाची सेवा. | ११ | २१.२% |
| २. | समाज आणि पोलीस ऐक्य निर्माण करणे. | ११ | २१.२% |
| ३. | पोलीसांच्या समस्या सरकारपर्यंत मांडणे. | ०२ | ३.८% |
| ४. | स्वत:ला सिध्द करणे. | १३ | २५.०% |
| ५. | जास्तीत जास्त महिलांचे प्रश्न सोडविणे. | ०१ | १.९% |
| ६. | महिला पोलीसांचे प्रश्न सोडविणे. | ०६ | ११.५% |
| ७. | ध्येय नाही. | ०८ | १५.४% |
| | एकूण | ५२ | १००% |

विविध प्रकारच्या ताण-तणावांना लढा देताना सुध्दा अनेक ध्येय, महत्त्वाकांक्षा त्यांनी बाळगल्या आहेत. बहुसंख्य उत्तरदात्या महिला पोलीसांनी स्वत:ला सिध्द करणे हे ध्येय (२५%) बाळगले आहे. उत्तरदात्या महिला पोलीसांनी समाजाची सेवा आणि समाज आणि पोलीस ऐक्य निर्माण करणे अशी महत्वाकांक्षा प्रत्येकी (२१.२%) उत्तरदात्यांनी बाळगली आहे. तर काहींना (११.५%) महिला पोलीसांचे प्रश्न सोडवायचे आहेत. तर (३.८%) उत्तरदात्यांना 'पोलीस' दलातील समस्या सरकारसमोर मांडून सोडवायची इच्छा आहे. (१.९%) उत्तरदात्यांना समाजातील अत्याचारीत महिलांना न्याय द्यायचा आहे. त्यांचे प्रश्न सोडवायचे आहेत.

तर (१५.४%) महिला पोलीसांनी कोणतेच ध्येय बाळगले नाही आहे.

२३. आवडते व्यक्तिमत्व : **(Favourite Personality)**

सारणी क्र.४.२.३ मध्ये उत्तरदात्यांचे आदर्श (पोलीस दलातील) दर्शविले आहेत.

सारणी क्र.४.२.३

उत्तरदात्यांचे आदर्श

| अ.क्र. | आदर्श | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | किरण बेदी | ३५ | ६७.३% |
| २. | मीरा बोरवणकर | १० | १९.२% |
| ३. | सुखविंदर सिंग | ०२ | ३.८% |
| ४. | सुरेश मेंगडे | ०२ | ३.८% |
| ५. | कोणताही कर्तव्यदक्ष अधिकारी | ०३ | ५.८% |
| | एकूण | ५२ | १००% |

उत्तरदात्या महिला पोलीसांना त्यांचे आवडते व्यक्तिमत्व विचारले. बहुसंख्य उत्तरदात्यांनी (६७.३%) महिला पोलीस दलातील प्रखर व्यक्तिमत्व असलेल्या महिला पोलीस किरण बेदी यांना आदर्श मानतात. त्या खालोखाल (१९.२%) मीरा बोरवणकर यांना आपला आदर्श मानले आहे. त्यानंतर मा. सुखविंदर सिंग आणि मा. सुरेश मेंगडे यांना प्रत्येकी (३.८%) उत्तरदात्यांनी आपला आदर्श मानले आहे. उत्तरदात्यांपैकी (५.८%) उत्तरदात्यांनी कोणताही कर्तव्यदक्ष अधिकारी आपला आदर्श असल्याचे सांगितले.

प्रामुख्याने उत्तरदात्यांनी 'पोलीस दलातील' स्त्री पोलीसांना आपला आदर्श मानले आहे.

२४. स्त्रियांनी या क्षेत्रात यावे का ? :

सारणी क्र.४.२.४ मध्ये समाजातील महिलांनी 'पोलीस दलात' पदार्पण करावे याविषयी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया दर्शविल्या आहेत.

सारणी क्र.४.२.४

स्त्रियांनी या क्षेत्रात येण्याविषयी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया

| अ.क्र. | प्रतिक्रिया | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ३० | ५७.७% |
| २. | नाही | २२ | ४२.३% |
| | एकूण | ५२ | १००% |

पोलीस दलात 'स्त्रियांनी पदार्पण करावे' अशी प्रतिक्रिया बहुसंख्य (५७.७%) उत्तरदात्यांनी दर्शविली. त्यांच्या मते ज्यावेळी महिला पोलीसांची संख्या वाढेल, त्यावेळी खऱ्या अर्थाने परिस्थिती बदलेल. अनेक महिलांचे प्रश्न सोडविले जातील. वाढती गुन्हेगारी, अत्याचार, बाल गुन्हेगार, अपहरण अशा गुन्ह्यांना आळा बसण्यासाठी महिला पोलीसांची आवश्यकता आहे.

कारण असे गुन्हे सोडविणे, त्यांचा शोध आणि त्यावर आळा बसविण्याचे काम महिला पोलीस योग्य भूमिकेतून पार पाडतात. त्याचप्रमाणे संख्या वाढल्याने महिला पोलीस ऐक्य वाढून आपल्या समस्या त्या सोडवू शकतील. पोलीस दल जनतेची सेवा करणारे सन्मानात्मक क्षेत्र आहे. तेव्हा अनेक स्त्रियांनी या क्षेत्रात यावे असे उत्तरदात्यांनी सांगितले.

तर (४२.३%) काही उत्तरदात्यांनी या क्षेत्रात येऊ नये असे सांगितले.

याबाबत किरण बेदी म्हणतात, पोलीस सेवेमुळे समाजात प्रत्यक्ष काम करण्याचे, चुकांची दुरूस्ती करण्याचे आणि सुधारणा करण्याचे अधिकार मिळतात.[२७]

(परमेश डंगवाल 'आय डेअर' : १९९६ : २२१)

प्रस्तुत प्रकरण 'महिला पोलीसांवर पडणारे ताणतणाव आणि त्याचे परिणाम' यामध्ये विविध प्रकारचे ताणतणाव, परिणाम, कारणे, महिला पोलीसांच्या अपेक्षा इत्यादी परिवर्त्यांसंबंधीच्या माहितीचे वर्गीकरण केले आहे.

राष्ट्रीय जाणीव, एक सामाजिक बांधिलकी म्हणून महिला पोलीसांचे अस्थैर्य, तिचे दुय्यम स्थान त्याचप्रमाणे 'पोलीस दलाची' जनसामान्यात ढासळत चाललेली प्रतिमा असे अनेक प्रश्न सोडविल्याचा या प्रकल्पाचा उद्देश असल्याने, प्रकरण – ३ – 'कोल्हापुरातील महिला पोलीसांची सामाजिक – आर्थिक परिस्थिती' आणि प्रस्तुत प्रकरण –४– 'महिला पोलीसांवर पडणारे ताणतणाव आणि त्याचे परिणाम' या दोन्ही प्रकरणांचा सारांश, निष्कर्ष आणि काही सूचना पुढील प्रकरणात मांडण्यात आल्या आहेत.

## संदर्भ :

१. वागळे वि.द., 'पोलीस आणि समाज', पुष्पक प्रकाशन, १९८९, पुणे, पान नं.१४–१५.

२. कश्यप रिजवाना, 'मंथन – पोलीस कुठे कुठे पुरा पडणार' – 'दक्षता' २००४, पान नं.८.

३. गट चर्चा – पोलीस मुख्यालय, १८ ते २१ जानेवारी, २००८.

४. खोपडे सुरेश, 'नवी दिशा – पोलीस प्रशासनाची नवी दिशा', स्नेह प्रकाशन, २००३, पान नं.२६३.

५. **Research Studies (1970 - 2006) Compendium, (BPRD), S. M. Channabassavanna 'Mental Health Problems among police personnel - An Epidemiological Study (1996), P - 153.**

६. साळगांवकर द.सा. – 'एका अनफिट पोलीस अधिकाऱ्याची डायरी' (२००५), लोक वाङ्मय गृह, पान नं. १८५.

७. कित्ता, पान नं. १८४.

८. **Dr. Pande Rekha and Shri. Joshi S., - 'Gender issues in the Police', Download, www - Google.com.**

९. खोपडे सुरेश, 'नवी दिशा – पोलीस प्रशासनाची नवी दिशा', उपरोक्त – ४, पान नं.१९४ – १९५.

१०. **Mahajan Amarjit, 'Indian Police Women', Deep and Deep Publication, New Delhi, 1981. P - 168.**

११. खोपडे सुरेश, 'नवी दिशा – पोलीस प्रशासनाची नवी दिशा', उपरोक्त – ४, पान नं.१८५.

१२. कित्ता, पान नं. १६३.

१३. कश्यप रिजवाना, 'मंथन–पोलीस कुठे कुठे पुरा पडणार'–उपरोक्त–१,पान नं.८.

१४. **Mahajan Amarjit, 'Indian Police Women', n - 10, P - 175.**

१५. **Ghosh S. K., 'Women in Policing', Light and Life Publishers, New Delhi, 1981, P - 141.**

१६. 'दक्षता', २००६, महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, पान नं. – ६९.

१७. **Mahajan Amarjit, 'Indian Police Women', n - 10, P - 177.**

१८. **Research Studies (1970 - 2006) Compendium, n-5, R. C.Tripathi, R. K. Naidu, K. Thapa and S. N. Biswas, 'Stress, Health and Performance' (1993) - A Study of Police Organisation in Uttar Pradesh, P - 120.**

१९. कश्यप रिजवाना, 'मंथन-पोलीस कुठे कुठे पुरा पडणार'-उपरोक्त-२,पान नं.८.

२०. 'तरूण भारत', ८ फेब्रुवारी, २००७, कोल्हापूर, पान नं.१.

२१. माने माणिक, 'मद्यपान : पोलीस, कायदा आणि समाज', 'दक्षता', सप्टेंबर, १९९८, पान नं.४०.

२२. **Ghosh S. K., 'Women in Policing', n - 15, P - 139.**

२३. कश्यप रिजवाना, 'मंथन-पोलीस कुठे कुठे पुरा पडणार'-उपरोक्त-१,पान नं.८.

२४. **Research Studies (1970 - 2006) Compendium, n - 5, Society for Participatory Research in Asia (PRIA), 'Community participation in Law Enforcement System', 2001, P - 202.**

२५. **Research Studies (1970 - 2006) Compendium, BRD. n-5, G.P. Joshi, 'Police Public Interface' (2001), P - 190.**

२६. **Research Studies (1970 - 2006) Compendium, BRD, n-5, Dr. Singh, 'Working and Living Conditions for Policemen' (2001), P - 235.**

२७. डंगवाल परमेश, 'आय डेअर', मेहता पब्लिशिंग हाऊस, १९९६, पान नं.२२१.